आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८,क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ, पुणे-४११००१
Website: trti.maharashtra.gov.in
दुरध्वनी- ०२०-२६३३०८५४

जा.क्र./आसंप्रसं/२०२६/स्पर्धा परीक्षा/प्रशिक्षण संस्था निवड/का.०४/ १७५ दि.१३/०२/२०२६

## महत्वाची सूचना

**सन २०२५-२६ स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत सामायिक चाळणी प्रवेश परीक्षांमधून केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) - नागरी सेवा परीक्षा (दिल्ली व महाराष्ट्र), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - राज्यसेवा, अभियांत्रिकी सेवा, विधी/न्यायिक सेवा, PSI/STI/ASO, अराजपत्रित गट क सेवा, महाराष्ट्र शिक्षण पात्रता परीक्षा (TET), बँक (IBPS), रेल्वे, नाबार्ड, एलआयसी इ. व तत्सम स्पर्धा परीक्षा आणि स्टाफ सिलेक्शन कमिशन (SSC) या पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता निवड झालेल्या उमेदवारांसाठी प्रशिक्षण संस्था निवडीकरीता विकल्प लिंक उपलब्ध करून देण्याबाबत...**

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी सन २०२५-२६ मध्ये राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांच्या लाभार्थी निवडीकरीता घेण्यात आलेल्या विविध ऑनलाईन सामायिक चाळणी प्रवेश परीक्षा (CET) २०२५-२६ द्वारे गुणवत्ता / निवड व प्रतिक्षा यादीतील (Merit list & Waiting List) मधील उमेदवारांना खालील नमूद पूर्व प्रशिक्षण योजनांकरीता प्रशिक्षण देणाऱ्या नामनिर्देशित प्रशिक्षण संस्थांची निवड करण्यासाठी विकल्प देण्याची सुविधा या कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

१. केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) - नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण (दिल्ली व महाराष्ट्र)
२. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - राज्यसेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण
३. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - अभियांत्रिकी सेवा (MES) परीक्षा पूर्व प्रशिक्षण
४. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - विधी/न्यायिक सेवा (JMFC) परीक्षा पूर्व प्रशिक्षण
५. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - PSI/STI/ASO परीक्षा पूर्व प्रशिक्षण
६. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - अराजपत्रित गट क सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण
७. बँक (IBPS), रेल्वे, नाबार्ड, एलआयसी इ. व तत्सम स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण
८. स्टाफ सिलेक्शन कमिशन (SSC) - वर्ग ३ पदांकरीता परीक्षा पूर्व प्रशिक्षण
९. महाराष्ट्र शिक्षण पात्रता परीक्षा (TET) परीक्षा पूर्व प्रशिक्षण

उपरोक्त नमूद पूर्व प्रशिक्षण योजनांकरीता प्रशिक्षण संस्था निवडीकरीता ऑनलाईन विकल्प देण्याची लिंक या कार्यालयाच्या https://cpetp.trti-maha.in संकेतस्थळावर **दि.१६/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.२२/०२/२०२६ रात्री ११:५९ वाजेपर्यंत** उपलब्ध राहील. ऑनलाईन विकल्प देण्याची लिंक उपरोक्त नमूद कालावधी पर्यंतच चालू राहील व त्यास **कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नाही**, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. प्रशिक्षण संस्था निवडीकरीता उमेदवारांनी संबंधित लिंकवर जाऊन **उमेदवार लॉगिन (Candidate Login)** मध्ये लॉगिन करणे आवश्यक आहे. त्यासाठी उमेदवारांनी प्रवेश अर्ज (Application Form) भरतांना वापरलेल्या युजर आयडी म्हणून ई-मेल व पासवर्ड म्हणून जन्मतारीख (YYYYMMDD) यांचा वापर करावा.

**जर एखादा उमेदवार एकाहून अधिक स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांसाठी पात्र ठरला असेल तर संबंधित उमेदवाराने आपल्या पसंतीनुसार केवळ एकाच योजनेची निवड करणे आवश्यक आहे.** ज्या पूर्व प्रशिक्षण योजनेची निवड उमेदवाराने केली असेल ती अंतिम मानण्यात येऊन त्या योजनेशी सबंधित नामनिर्देशित केलेल्या प्रशिक्षण संस्थांचे विकल्प देण्याची सुविधा उपलब्ध होईल. जितक्या प्रशिक्षण संस्था नमूद आहेत त्या सर्वांना उमेदवारांनी पसंतीक्रम/ विकल्प (Preference) द्यायचा आहे. सर्व प्रशिक्षण संस्थाना पसंतीक्रम/ विकल्प दिल्यानंतर ई-मेल व मोबाईल OTP द्वारे सदरचा पसंतीक्रम / विकल्प (Preference) सत्यापित (Verify) केल्यानंतरच पसंतीक्रम / विकल्प Submit करण्याचे बटन (Tab) कार्यान्वित होईल. सबमिट वर क्लिक केल्यानंतर आपले पसंतीक्रम / विकल्प नोंद होऊन त्याची पोच पावती (Preference Acknowledgement Receipt) तयार होईल. **प्राप्त OTP द्वारे आपण पसंतीक्रम / विकल्प सत्यापित (Verify) करत नाही तोपर्यंत आपले विकल्प अंतिम होणार नाही. तद्नंतर प्राप्त झालेले पसंतीक्रम / विकल्प हे अंतिम असून त्यात कोणताही बदल करता येणार नाही.** त्यामुळे उमेदवारांना सूचित करण्यात येते की योजनेची निवड अत्यंत काळजीपूर्वक करावी.

**उमेदवारांनी कोणत्याही अमिषाला किंवा प्रलोभनाला बळी पडू नये. तसेच ई-मेल व मोबाईल OTP द्वारे प्राप्त OTP प्रशिक्षण संस्था चालकांना किंवा संबंधित प्रशिक्षण संस्थेच्या कोणत्याही व्यक्तीला देऊ नये. दिल्यास आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था जबाबदार राहणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

सदरच्या विकल्प लिंक वर संपर्क साधा (Contact Us) या शीर्षकाखाली सर्व सबंधित योजनांचे संपर्क, ई-मेल दिले आहे. तसेच विकल्प लिंक वर लॉगिन केल्यानंतर Support या शीर्षकाखाली Raise A Ticket या सुविधेद्वारे आपली समस्या नोंदविण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. **तरी सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की त्यांनी केवळ याच मार्गान आपल्या समस्या नोंदवाव्या. इतर कोणत्याही जसे की ई-मेल, लेखी तक्रार किंवा संपर्क क्रमांकावर आपल्या तक्रारी अथवा समस्येची नोंद घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

संबंधित खाजगी नामनिर्देशित प्रशिक्षण संस्थांमधील उपलब्ध प्रशिक्षणार्थी संख्येनुसार उमेदवारांना प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश दिला जाईल व तद्नंतर मूळ कागदपत्राच्या पडताळणी अंती प्रवेश अंतिम करण्यात येईल. **उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांच्या पडताळणी दरम्यान कागदपत्रे कमी/अपूर्ण अथवा चुकीचे आढळल्यास सबंधित उमेदवाराचा प्रवेश रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना राहतील.**

**<u>अत्यंत महत्वाच्या सूचना –</u>**

१. उमेदवाराने ज्या योजनेसाठी प्रवेश घेतलेला आहे त्या योजनेचा जितका कालावधी आहे त्या कालावधीचा प्रशिक्षण कार्यक्रम हा उमेदवाराला पूर्ण करणे बंधनकारक आहे. या प्रशिक्षण कालावधी दरम्यान इतर कोणत्याही कारणास्तव उमेदवाराला सदर प्रशिक्षण कार्यक्रम अर्धवट सोडता येणार नाही.

२. उमेदवारांनी ऑनलाईन सामायिक प्रवेश परीक्षा (CET) देतांना आवश्यक व मागणी केलेले कागदपत्रे जे प्रवेश परीक्षा अर्जासाठी उपलोड केले होते त्या आधारे उमेदवारांना ऑनलाईन सामायिक प्रवेश परीक्षा देता आली त्या उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी ही त्यांच्या प्रवेशानंतर प्रशिक्षण संस्थेमध्ये करण्यात येईल व सर्व कागदपत्रांच्या तपासणी अंती एखादा उमेदवार अपात्र ठरल्यास त्याचा प्रवेश रद्द करून त्याच्या जागी प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची निवड करण्यात येईल.

३. **उमेदवाराने विकल्प लिंककरीता विकल्प निवडीचा जितका कालावधी दिलेला आहे त्याच कालावधीत नोंदणी करणे अनिवार्य आहे.** उमेदवाराने जर विहित कालावधीत पूर्व प्रशिक्षण योजनेच्या विकल्पाची निवड केली नाही तर त्या उमेदवारांचा प्रवेश रद्द करून त्यांच्या जागी प्रतीक्षा यादीतील उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

४. पात्र उमेदवारांनी एकापेक्षा अधिक योजनेसाठी अर्ज केला असल्यास त्यांना त्यांच्या प्रशिक्षण संस्था निवडीच्या विकल्प लिंक वर जाऊन त्याच्या पसंतीनुसार **एकच योजना निवड करण्याची मुभा** आहे. योजना निवड केल्यानंतर उमेदवारास इतर कोणत्याही योजनेचा लाभ घेता येणार नाही तसेच एकदा निवड केलेली **योजना रद्द करता येणार नाही किंवा योजना बदलूनही दिली जाणार नाही** याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

५. उमेदवाराची ज्या प्रशिक्षण योजनेत निवड झाली आहे तसेच इतर कोणत्याही प्रशिक्षण योजनेच्या प्रतिक्षा यादीत (Waiting List) मध्ये नाव असेल अशा उमेदवारांना केवळ ज्या प्रशिक्षण योजनेत निवड झाली आहे त्याच प्रशिक्षण योजनेच्या प्रशिक्षण संस्थांचा प्राधान्यक्रम देण्याकरीता पर्याय उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

६. एखाद्या उमेदवाराचे ज्या ज्या प्रशिक्षण योजनेच्या प्रतिक्षा यादीमध्ये नाव असेल अशा उमेदवारांना त्या सर्व प्रशिक्षण योजनांच्या प्रशिक्षण संस्थांचा प्राधान्यक्रम देण्याकरीता पर्याय उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

७. **आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजनांकरीता काठीण्य पातळीनुसार चढत्या क्रमाने (वर्ग-४ < वर्ग-३ < वर्ग -२ < वर्ग - १) घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमासाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवाराने पूर्वी तुलनेने कमी काठीण्य पातळी पूर्व प्रशिक्षणाचा लाभ घेतला असेल तर संबंधित उमेदवाराला चढत्या क्रमाने प्रशिक्षण कार्यक्रमाच्या प्रवेशास पून:श्च केवळ एकदाच लाभ घेता येईल. त्याबाबत सविस्तर माहिती खालीलप्रमाणे –**

- ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी पोलीस व सैन्य भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेचा लाभ घेतला असेल अशा विद्यार्थ्यांना काठीण्य पातळीच्या पात्रतेनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - अराजपत्रित गट क, स्टाफ सिलेक्शन कमिशन (SSC) - गट क आणि बँक (IBPS) रेल्वे, नाबार्ड, एलआयसी इ. व तत्सम परीक्षा, महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC)- PSI/STI/ASO, राज्यसेवा, अभियांत्रिकी सेवा, विधी / न्यायिक सेवा, केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) - नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण (दिल्ली व महाराष्ट्र) परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजनेतील कोणत्याही एका प्रशिक्षण योजनेचा लाभ घेता येईल.
- ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - अराजपत्रित गट क किंवा सिलेक्शन कमिशन (SSC) - गट क किंवा बँक (IBPS) रेल्वे, नाबार्ड, एलआयसी इ. व तत्सम परीक्षांचे किंवा महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) यापैकी कोणत्याही एका पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजनेचा लाभ घेतला असेल अशा विद्यार्थ्यांना काठीण्य पातळीच्या पात्रतेनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC)-PSI/STI/ASO,राज्यसेवा, अभियांत्रिकी सेवा, विधी / न्यायिक सेवा, केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) - नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण (दिल्ली व महाराष्ट्र) परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजनेतील कोणत्याही एका प्रशिक्षण योजनेचा लाभ घेता येईल.
- ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - PSI/STI/ASO या स्पर्धा परीक्षांचे पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजनेचा लाभ घेतला असेल अशा विद्यार्थ्यांना काठीण्य पातळीच्या पात्रतेनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - राज्यसेवा, अभियांत्रिकी सेवा, विधी / न्यायिक सेवा, केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) - नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण (दिल्ली व महाराष्ट्र) परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजनेतील कोणत्याही एका प्रशिक्षण योजनेचा लाभ घेता येईल.

- ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC)-राज्यसेवा किंवा अभियांत्रिकी सेवा किंवा विधी / न्यायिक सेवा परीक्षा यापैकी कोणत्याही एका पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजनेचा लाभ घेतला असेल अशा विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) - नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण (दिल्ली व महाराष्ट्र) परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजनेतील कोणत्याही एका प्रशिक्षण योजनेचा लाभ घेता येईल.
- ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) - नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण (दिल्ली किंवा महाराष्ट्र) पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजनेचा लाभ घेतला असेल अशा विद्यार्थ्यांना शासन मान्यतेनुसार तुलनेने कमी काठीण्य पातळी असलेल्या स्पर्धा पूर्व प्रशिक्षणाचा लाभ घेता येणार नाही.

८. **उमेदवाराने यापूर्वी ज्या प्रशिक्षण योजनेचा लाभ घेतला आहे त्याच प्रशिक्षण योजनेचा पुन्हा लाभ घेता येणार नाही. तसे आढळल्यास सबंधित उमेदवाराचा प्रवेश रद्द करण्यात येईल.**

९. उमेदवाराने खोटे किंवा बनावट कागदपत्रे सादर करून योजनेचा लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराकडून संपूर्ण प्रशिक्षणाचा खर्च वसूल करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१०. आरक्षण नियमानुसार महिला, दिव्यांग, अनाथ यांच्यासाठी जागा आरक्षित ठेवल्या जातील. परंतु आरक्षित जागेवर महिला, दिव्यांग व अनाथ प्रवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा गुणानुक्रमे पात्र असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

११. उमेदवाराला आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडून प्रशिक्षण संस्था अंतिम झाल्यानंतर संबंधित प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षणासाठी तात्काळ रुजू होणे बंधनकारक आहे. तसेच प्रशिक्षण सुरू होण्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाच्या आत रुजू झाल्याचे Biometric/ Face Recognition नोंदणी (Onetime Registration) या संस्थेकडे जमा झाल्यानंतर जे उमेदवार दिलेल्या तारखेपासून ०५ दिवसाच्या आत रुजू होत नाहीत, अशा उमेदवारांची निवड रद्द करून प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. अपवादात्मक परिस्थितीमध्ये योग्य निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचा असेल.

१२. **सदरचे पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम हे ऑनलाईन स्वरूपाचे नसून ते ऑफलाईन व नियमित स्वरूपाचे आहेत.** त्यामुळे प्रशिक्षण कालावधी दरम्यान दर महा किमान ७५% प्रशिक्षण वर्गाला उपस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच विद्यावेतन अदा करण्यात येईल. तसेच जितक्या कालावधीचा प्रशिक्षण कार्यक्रम आहे तो नियमितपणे पूर्ण करणे अनिवार्य आहे.

१३. प्रशिक्षण योजनेच्या कालावधी दरम्यान उमेदवाराला कुठेही शासकीय/निमशासकीय नोकरी करता येणार नाही. तसे आढळल्यास किंवा याबाबत या कार्यालयास काही तक्रार प्राप्त झाल्यास सबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल.

१४. प्रशिक्षण योजनेच्या कोणत्याही टप्प्यावर प्रशिक्षण सोडवायचे असल्यास उमेदवाराला घेतलेले सर्व लाभ, दरम्यानच्या काळात प्रशिक्षण योजनेकरीता झालेला सर्व खर्च आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेला परत करणे अनिवार्य राहील. तसे न केल्यास सबंधित उमेदवारावर कायदेशीर आणि दंडात्मक कारवाई केली जाईल.

१५. **सदरचे पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम हे अनिवासी असल्यामुळे** उमेदवारांनी आपली निवास व भोजन व्यवस्था स्वत: करावयाची आहे.

१६. सदर योजनेच्या अंमलबजावणीत काही अडचणी उद्भवल्यास त्यात उचित बदल करण्याचे अधिकार आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना असतील.

१७. **उमेदवाराने दिलेल्या प्राध्यान्यक्रमानुसार पोर्टलद्वारे प्रशिक्षण संस्था अंतिम झाल्यानंतर (Institute Allotment) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत ई-मेल / SMS किंवा**

**संकेतस्थळावर अधिकृत सुचनेद्वारे कळविण्यात येईल. तद्नंतर उमेदवाराने अंतिम वाटप (Allotment) झालेल्या प्रशिक्षण संस्थेकडे खाली नमूद केल्याप्रमाणे आवश्यक शैक्षणिक तसेच इतर कागदपत्रांची प्रत्येकी एक सुस्पष्ट छायांकित (झेरॉक्स) प्रतींचा एक संच जमा करावा.**

१. अनुसूचित जमातीचे मूळ प्रमाणपत्र
२. अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र
३. दहावी गुणपत्रिका / प्रमाणपत्र
४. बारावी गुणपत्रिका / प्रमाणपत्र
५. पदवी गुणपत्रिका / प्रमाणपत्र
६. वयाचा पुरावा दर्शविणारा खालीलपैकी जन्मदाखला, दहावी उत्तीर्ण प्रमाणपत्र, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅन कार्ड यापैकी कोणतेही एक कागदपत्र
७. आधारकार्ड
८. महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
९. आधार सीडिंग (Aadhaar Seeding) असलेले उमेदवाराचे बँक तपशील पासबुक किंवा Cancel Cheque
१०. तहसीलदार कार्यालयातून निर्गमित केलेला मागील तीन वर्षाचा एकत्रित (आर्थिक वर्ष २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५) किंवा आर्थिक वर्ष २०२४-२५ चा मूळ उत्पन्नाचा दाखल्याची प्रत.
११. दिव्यांग असल्यास, संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक (सिव्हील सर्जन) यांनी निर्गमित केलेला दिव्यांगत्वाचा दाखला.
१२. अनाथ असल्यास, संबंधित उपायुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय यांनी निर्गमित केलेला अनाथाचा दाखला
१३. अद्यावत फोटोग्राफ (Passport size photo)

उमेदवारांना प्रवेश प्रक्रियेसाठी ज्या काही सूचना निर्गमित करण्यात येतील त्या फक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. त्यामुळे उमेदवारांनी वेळोवेळी या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देणे अनिवार्य आहे.

**तांत्रिक अडचणी उद्भवल्यास -**

खालील दिलेल्या क्रमांकावर किंवा ई-मेलवर अडचण / समस्या सोडविण्याबाबत संपर्क साधावा.

- संपर्क क्रमांक : ९५२९९१५२११४
- ई-मेल आय डी : cpetp_helpdesk@trti-maha.in

**इतर अधिकच्या माहितीसाठी -**

- संपर्क क्रमांक : ०२०-२६३३०८५४

(चंचल पाटील)
**आयुक्त,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**